# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२४/ आश्विन २५, शके १९४६.

### ९९. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय सत्रात एकूण २३५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २३५ निवेदनांपैकी ९२ निवेदने सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२१ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित १४३ निवेदनांपैकी ४८ निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित ९५ निवेदनांपैकी ३० निवेदने गुरुवार, दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ६५ निवेदनांपैकी ७ निवेदने सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३८ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ५८ निवेदनांपैकी १३ निवेदने सोमवार, दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ५ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ४५ निवेदनांपैकी ०२ निवेदने सोमवार, दिनांक १३ मे, २०२४ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ३६ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ४३ निवेदनांपैकी ०२ निवेदन गुरुवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ९१ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ४१ निवेदनांपैकी ०३ निवेदन शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १७ ऑक्टोबर, २०२४**

...२/-

<u>याची प्रत</u> :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (website.)

४. अनुवाद कक्ष

५. प्रतिवेदन

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**डॉ. राहूल पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"" परभणी शहरातील विविध विकासकामे गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, त्यामुळे शहराच्या विकास खुंटणे, परभणी शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता सद्दस्थितीत परभणी शहरासाठी अस्तित्वातील पाणीपुरवठा योजना कमी पडत असणे, त्यामुळे शहरातील नागरिकांना पाण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागत असणे, त्याच प्रमाणे भविष्यातील विकास गृहीत धरुन वाढीव पाणी पुरवठ्याची होत असलेली मागणी, त्यानुषंगाने परभणी शहरासाठी येलदरी शाश्वत उभ्ववाव्दारे समांतर पाणी पुरवठा योजना अमृत २.० अंतर्गत राबविण्यासाठी चा प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसूची दि. ०६.०५.२०२२ रोजी च्या पत्रान्वये सुधारीत केल्याप्रमाणे रु. १५७.१० कोटचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मुख्य अभियंता म.जी.प्रा औरंगाबाद यांनी दि ०२.०८.२०२२ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केली करणे, त्यानुसार सदर प्रकल्पाला प्रशासकीय मान्यतेसाठी चा प्रस्ताव मा. प्रधान सचिव - २, नगर विकास विभाग मुंबई प्रलंबित असणे, तसेच परभणी शहरासाठी मलनि:स्सारण पाण्याची विल्हेवाट लावण्याचा उददेशाने मलनि:स्सारण (भुयारी गटार) योजना परभणी शहरासाठी राबविणे अत्यंत आवश्यक असणे, मा. सर्वोच न्यायालय व मा. राष्ट्रीय हरीत लवादाने केंद्र व राज्य शासनाला वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक महानगरपालिका / नगरपालिकांमध्ये पर्यावरणाचा संरक्षणासाठी व सुधारणा करण्यासाठी शहरात भुयारी गटार योजना राबविणे व कार्यान्वित करणे बंधनकारक केलेले असणे, तथापी परभणी शहरात कोणतीही भुयारी गटार योजना कार्यान्वीत नसणे, परभणी शहर भुयारी गटार (मलनि:स्सारण) योजना अमृत २.० अंतर्गत राबविणेसाठीचा रु.४०८.८३ कोटी चे अंदाजपत्रक तयार करुन मुख्य अभियंता, म.जी.प्रा औरंगाबाद यांनी दि ०९.११.२०२२ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली असणे, त्यानुसार सदर प्रकल्पाला प्रशासकीय मान्यतेसाठी चा प्रस्ताव मा. प्रधान सचिव - २, नगर विकास विभाग, मुंबई यांच्याकडे प्रलंबित असणे, तसेच परभणी महानगरपालिकेंतर्गत २०१८ मध्ये १००० आसन क्षमतेच्या नवीन नाट्यगृहाचे बांधकाम व विकास कामांना नगरविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे, सदर कामासाठी मार्च, २०१८ मध्ये १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणे, सद्य:स्थितीत निधी अभावी सदर नाटयगृहाचे काम अपूर्ण अवस्थेत असणे, नाट्यगृहाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करण्यासाठी वाढीव ११ कोटी ७५ लाख रुपये निधीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव १६/०६/२०२२ रोजी परभणी महानगरपालिकेने शासनास सादर केलेला असणे, परंतु अद्यापही सदर प्रस्तावास मंजूरी न मिळणे, शहराच्या विकासाठी व सर्वसामान्य जनतेला चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासनाने उक्त प्रलंबित विकास कामांना तातडीने मान्यता देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.""

**-: <u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u> :-**

परभणी शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता येलदरी धरणावरून उद्भवातून प्रस्तावित परभणी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास व परभणी शहरात मलनि:स्सारण व्यवस्था राबविण्याच्या अनुषंगाने परभणी शहराच्या मलनि:स्सारण प्रकल्पास राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीने मान्यता दिलेली असून सदर प्रकल्पांचे प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीसमोर सादर करण्यात आले होते सदर समितीच्या शिफारशीस अनुसरून सदर प्रकल्पांच्या अनुषंगाने शासन स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

'महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद' या योजनेंतर्गत परभणी महानगरपालिकेस नवीन नाट्यगृहाचे बांधकाम करण्याकरिता रुपये १०.०० कोटीच्या कामास शासन स्तरावरून मान्यता दिली असताना परभणी महानगरपालिकेने रुपये १५.२५ कोटी किंमतीच्या कामास मान्यता दिली तसेच, महानगरपालिकेने वातानुकुलीन यंत्रणेसह आणखी रुपये ६.५० कोटी किंमतीची विद्युत कामे प्रस्तावित केली आहेत. अशाप्रकारे सदर नाट्यगृहाचा एकूण खर्च रुपये २१.७५ कोटी पर्यंत वाढला आहे. उर्वरीत स्थापत्य व वातानुकूलन यंत्रणेसह विद्युत कामे पूर्ण करण्याकरिता आवश्यक असलेला रुपये ११.७५ कोटी निधी मंजूर करण्याबाबत दिनांक १६ सप्टेंबर, २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत घोषणा करण्यात आलेली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये विधानसभा सदस्य श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. आशिष शेलार, श्री. प्रशांत ठाकूर, यांनी मांडलेली लक्षवेधी सूचना क्र. ६९६

"मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे. मुंबईच्या प्रदूषणाबाबत येणारे अहवाल सकारात्मक नसणे, त्याबाबत विविध संस्थांचे अहवाल सादर झालेले आहेत. यामध्ये मुंबई येथे असणाऱ्या डम्पिंग ग्राऊंडचा स्थळ आणि कार्यपध्दतीच्या दृष्टीने अभ्यास केला तर मुंबई हे सर्वात धोकादायक शहर आहे, असे निष्पन्न होणे, ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असतानाही मार्केटमध्ये भाजीवाले, फळवाल्याकंडे, किराणा दुकानात या पिशव्या सर्रास उपलब्ध होत असणे, तेल, दुध सुटे घेताना उपलब्ध होणाऱ्या पिशव्याही पातळ असणे, या पातळ पिशव्या रिसायकल होत नसणे, त्यामुळे त्या गोळा केल्या जात नसणे, त्यामुळे हा कचरा साठत जाणे, मुंबई महानगरपालिकेच्या अनेक भागांमध्ये लोक सॅनिटरी पॅड्स आणि डायपर गटारांमध्ये तसेच शौचालयांमध्ये टाकत असल्याचे आढळून येणे, यामुळे पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढते असणे, तसेच विविध संस्थांच्या संशोधकांनी सादर केलेल्या अहवालातसुध्दा भारतातील प्रमुख ४९६ शहरांमध्ये मुंबई हे प्लास्टिक प्रदूषणाचा सर्वात अधिक धोका असलेले शहर आहे, असे नमूद करणे,प्लास्टिकचा जास्त धोका असण्याचे एक कारण मुंबईतील डम्पिंग ग्राऊंड्स असल्याचेही त्यांनी नमूद करणे, वारा, पाऊस, पूर यामुळेही कचऱ्याची गळती होऊन, कचरा वाहून जाऊन प्रदूषणाचा धोका वाढत असणे, मुंबईमध्ये प्लास्टिकबंदीचे धोरण राबवले गेले. काही प्रमाणात ते यशस्वीही झाले. परंतु, लोकसंख्येच्या तुलनेत प्लास्टिकवर नियंत्रण आणणे अवघड होत असणे, आजही मुंबईतील प्लास्टिकचा दररोजचा वापर साधारण ९ हजार टन एवढा असणे, अनेक लोक प्लास्टिक बॅग्ज एकदा वापरुन टाकतात, यामध्ये पुनर्वापर करता येऊ शकणाऱ्या प्लास्टिक बॅग्जचाही समावेश असणे, मुंबईतील डम्पिंग ग्राऊंड्स समुद्राजवळ असणे हे अत्यंत धोक्याचे असणे, या कचऱ्याचा मानवी जीवनावर तसेच, सागरी जीवांवर धोकादायक परिणाम होणे, प्लास्टिकचे लवकर विघटन होत नसणे, तसेच ते जाळणेही वातावरणाच्या दृष्टीने हानीकारक आहे. नद्यांमध्ये, समुद्रात फेकणेही हानीकारक असणे, त्यामुळे प्लास्टिकचा वापर करणा-या विरोधात कडक दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

## मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन

सद्या मुंबईमध्ये विविध ठिकाणी बांधकामे, खोदकामे व पाडकामे २४ तास सुरु आहेत परिणामी बांधकामातील माती, सिमेंट काँक्रेटचे कण हवेत मिसळतात. तसेच कारखाने, वाहनातून निघणारा धूर व इतर रसायनामुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढत असते. त्यासोबतच थंडीच्या कालावधीत कोरडे वारे आणि ढगाळ हवामानामुळे मुंबई शहरातील वायु प्रदूषणाचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत ठरते. मुंबईतील नैसर्गिक हवामानाच्या स्थितीनुसार प्रदूषणाचे प्रमाण कमी-जास्त होत असल्याचे आढळून येते.

मुंबई शहरातील वाढते वायु प्रदूषण तात्काळ नियंत्रणात आणण्यासाठी "मुंबई वायू प्रदूषण निर्मुलन आराखडा" मार्च २०२३ मध्ये तयार करण्यात आला. त्यामध्ये वायु प्रदूषण करणारे विविध स्त्रोतांची माहिती घेऊन त्यानुसार उपाययोजना सुचविण्यात आल्या. सदर सुचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता महानगरपालिकेच्या सर्व विभाग कार्यालयात वायू प्रदूषण

नियंत्रणासाठी कृती दलांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच सदर कृती दलास वायू प्रदूषणाच्या निर्मुलनाकरीता निर्देश देण्यात आलेले आहेत.

**मुंबई महानगर पालिका घनकचरा व्यवस्थापना बाबत माहिती:**

१) **कांजुर येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्र:** बृहन्मुंबई महानगरपालिकेचा नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी प्रकल्प कांजूर येथे अंदाजे ६५ हेक्टर परिसरात मार्च २०१२ पासून कार्यान्वित आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक २३ ऑगस्ट,२०२२ रोजी नागरी घनकचरा १००० मे. टन प्रति दिन कंपोस्टींग पध्दतीने व ६५०० मे. टन प्रति दिन बायोरियाक्टर लँन्डफिल पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी या प्रकल्पास प्राधिकारपत्र देण्यात आले असून ते दिनांक ३१ ऑक्टोबर,२०२६ पर्यंत वैध आहे. सद्यस्थितीत कांजूर येथे दररोज स्विकारण्यात येणाऱ्या ५६५० मे.टन नागरी घन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते. त्यापैकी सुमारे ४६५० मे.टन इतक्या नागरी घन कचऱ्यावर बायोरिऍक्टर तंत्रज्ञानाव्दारे व उर्वरित १००० मे.टन नागरी घन कचऱ्यापासून खत निर्मिती केली जाते.

२) **देवनार क्षेपणभूमी:** देवनार क्षेपणभुमी ही १२० हेक्टर जागेत असून ती सन १९२३ पासून कार्यरत आहे. मुंबई शहरामध्ये गोराई, वर्सोवा, कुर्ला व महालक्ष्मी हे चार कचरा हस्तांतरण केंद्रे आहेत.केंद्रामध्ये नजीकच्या वॉर्डमध्ये छोट्या वाहनांमधून येणारा कचरा स्वीकारला जातो व हा कचरा चोवीस तासांच्या आत मोठ्या बंदिस्त वाहनांद्वारे कांजूर अथवा देवनार क्षेपणभूमी येथे पाठविण्यात येतो.सद्यस्थितीत अंदाजे ८०० ते १००० मे.टन प्रतिदिन घनकचऱ्याचे अशास्त्रोक्त पध्दतीने डंपींग केले जाते. सदर कचऱ्यावर हर्बल दुर्गंधीनाशक द्रव्य टाकले जाते व त्यावर मातीचे/ डेब्रीज आवरण टाकले जाते. कचऱ्यातून उर्त्सजीत होणाऱ्या मिथेन वायु करीता त्यामध्ये सछिद्र एचडीपीई पाईप बसविण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीमध्ये देवनार क्षेपणभूमी येथे सुमारे १९.१ मिलीयन मेट्रिक टन एवढा नागरी घनकचरा (लिगसी वेस्ट) टाकला गेला असल्याची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकामार्फत देण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत या ठिकाणी ६०० मे. टन प्रतिदिन कच-यापासून ४ मेगा वॅट विद्युतनिर्मीती प्रकल्प उभारणीचे काम सुरु झाले आहे.

३) **मुलुंड क्षेपणभूमी**: महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत प्राधिकारपत्र देण्यात आले असून त्याची वैधता दिनांक ३१.१२.२०२३ पर्यंत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका परिसरात निर्माण होणारा घरगुती घनकचरा मुलुंड येथील क्षेपण भूमीत सन २०१५ पर्यंत विनाप्रक्रिया विल्हेवाट लावलेली असून, सदर ठिकाणी एकूण ७० लाख मेट्रिक टन घनकचरा आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुलुंड क्षेपण भूमित घनकचऱ्याची विल्हेवाट सन २०१५ पासून बंद केलेली असून सद्य:स्थितीत मुलुंड क्षेपण भूमीत बायोमायनिंग प्रकल्प राबवला जात आहे. बायो मायनिंग प्रक्रियेद्वारे घनकचऱ्यापासून प्लास्टिक, धातु माती व इतर मटेरियल वेगवेगळे केले जातात. बायो मायनिंग प्रकल्प सन २०१८ पासून सुरू झालेला असून निर्माण होणाऱ्या प्लास्टिकचे पायरोलिसीस व घनकचऱ्यापासून आरडीएफ बनवण्याचा प्रकल्प प्रस्तावित आहे. बायोमायनिंग प्रकल्पाद्वारे मुलुंड क्षेपण भूमीतील घनकचऱ्याची विल्हेवाट सन २०२५ पर्यंत लावण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मानस आहे. आज पर्यंत बायोमिनिंग प्रक्रियेद्वारे साधारणतः दहा लाख टन घनकचऱ्यावर प्रक्रिया केली गेलेली आहे .

मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे की उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता मुंबई महानगरपालिकेच्या कोणत्याही क्षेपणभूमी/नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातून पावसाळ्यात, पूरात तसेच इतर कोणत्याही ऋतूत कचरा व प्लास्टिक समुद्रात किंवा खाडीत वाहून जात नाही.

महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत, प्लास्टिक आणि थर्माकॉल इत्यादीपासून बनवलेल्या अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, साठवणूक, वाहतूक यांचे नियमन करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्लॅस्टिक आणि थर्मोकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक), अधिसूचना, दिनांक २३.०३.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. ज्यामध्ये दिनांक ११ एप्रिल २०१८, दिनांक ३० जून २०१८, दिनांक १४ जून २०१९, दिनांक २८ मार्च,२०२२, दिनांक १५ जुलै, २०२२ आणि दिनांक ३०.११.२०२२ च्या अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली आहे. सदर अधिसूचने अंतर्गत राज्यात खालील बाबींवर बंदी आहे:

१. प्लास्टिक पासून बनविल्या जाणाऱ्या पिशव्या (carry bags) (हॅण्डल सहित किंवा हॅण्डल शिवाय).
२. थर्माकॉल व प्लास्टिक पासून बनविण्यात येणाऱ्या व एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोजेबल वस्तु उदा. स्ट्रॉ, ताट, कप्स, प्लेटस, ग्लासेस, काटे, चमचे, भांडे, वाडगा, कन्टेनर इत्यादि. हॉटेलमध्ये अन्न पदार्थ पॅकेजिंग साठी वापरले जाणारे एकल वापर होणारे प्लास्टिक भांडे, वाटी , चमचे इत्यादी व साठवण्यासाठी कप/पाऊच, उत्पादने गुंडाळण्यासाठी किंवा साठवण्यासाठी प्लास्टिकसह पॅकेजिंग.
३. सजावटीसाठी प्लास्टिक व थर्माकॉलचा वापर इत्यादी.
४. प्लास्टिक लेपित (Coating) तसेच प्लास्टिक थर (Laminated) असणाऱ्या पेपर/अलुमिनियम इत्यादीपासून बनविलेल्या डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटे, वाडगा, कंटेनर, इत्यादी एकल वापर उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे

केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने ऑगस्ट २०२१ मध्ये अधिसूचित केलेल्या सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन निय, २०२१ नुसार एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिक वस्तू प्रतिबंधित आहेत.

महाराष्ट्र प्लॅस्टिक आणि थर्मोकॉल अधिसूचनेची अंमलबजावणीसाठी प्राधिकृत आणि अधिकारप्राप्त अधिकारी पुढीलप्रमाणे आहेत: - स्थानिक स्वराज्य संस्था, महसूल विभाग, जिल्हा परिषद, संचालक आरोग्य सेवा, शिक्षण मंडळाचे संचालक, पर्यटन पोलीस आणि पोलीस विभाग, उपायुक्त पुरवठा, राज्य कर विभाग, परिक्षेत्र वन अधिकारी. सदर अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेली आहे:

(अ) **अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दोन दोन समित्या स्थापना केल्या आहेत:**

१. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक मार्गदर्शनासाठी तज्ञ समिती.
२. माननीय मंत्री (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली अधिसुचनेमध्ये आवश्यक सुधारणा ठरवण्यासाठी आणि अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी शक्तीप्रदत्त समिती.

(ब) माननीय मुख्य सचिव, सरकार यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यस्तरीय विशेष कृतीदल (STF) ची स्थापना दिनांक ०१.११.२०२१ रोजी करण्यात आली आहे.

(क)एकल वापर प्लास्टिकच्या अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने कृती आराखडा तयार केला आहे आणि दिनांक ०८.०२.२०२२ रोजी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला (CPCB) सादर केला आहे.

(ड)जिल्हास्तरीय कृतीदल आणि शहर स्तरावर (दशलक्ष अधिक शहर) कृतीदलची स्थापना दिनांक २६.०४.२०२२ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आली आहे.

(इ) दक्षतेसाठी प्रत्येक शहर स्तरावर दक्षतापथके तयार करण्यात आली आहेत. जिल्हास्तरीय दक्षतापथकही स्थापन केले आहे. तसेच अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश देण्यात आले आहेत.

सन २०१८ पासून २०२३ पर्यंत राज्यात प्लास्टिक कॅरी बॅग व थर्माकॉलचे गैर उत्पादन, विक्री व हाताळणी अंतर्गत विक्रीकर्त्या वर कारवाई करण्यात आली असून रु. १४.२७/- कोटी दंड वसूल करण्यात आला आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला द्वारे विकसित केलेल्या तक्रार निवारण ॲपच्या अंमलबजावणीसाठी सर्व ४०३ स्थानिक स्वराज्य संस्थांचे जिओ-सन मॅप देण्यात आले आहेत. सर्व ४०३ स्थानिक स्वराज्य संस्थांचे नोडल अधिकाऱ्याची नोंद करण्यात आली असून त्या स्थानिक स्वराज्य संस्था एकाल वापर मॉनिटरिंग पोर्टलवर नोंदणीकृत आहेत.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रा मध्ये दिनांक २३.०६.२०१८ ते दिनांक ३०.०६.२०२३ पर्यंत प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या व वस्तूंचा संग्रह, वितरण व विक्री करणा-यांविरुध्द कारवाई करुन सुमारे ८४ हजार किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले असून रु. ४ कोटी ६३ लाख इतका दंड आकारण्यात आलेला आहे. जप्त करण्यात आलेला प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नोंदणीकृत उद्योगास पुढील विल्हेवाटीकरीता देण्यात आला.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई कार्यक्षेत्रात १०७ प्लास्टीक उद्योग असून बहुतांश उद्योग हे बंद आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयामामार्फत प्लास्टीकच्या कारखान्यांना भेटी देण्यात आल्या असून नियमानुसार बंदी असलेल्या प्लास्टीक माल बनविणाऱ्या / साठवणूक करणाऱ्या एकुण ५३ उद्योगांना बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वार्षिक अहवालानुसार वर्ष २०२१-२२ या आर्थिक कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत दररोज ६३८२ मे. टन/प्रतिदिन एवढा घनकचरा निर्माण झाला. तसेच, १२,७७६ मे. टन एवढा प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला, त्यापैकी १०,९५८ मे. टन प्लास्टिक कचरा ग्रेन्युल बनवण्यासाठी वापरला गेला व पायरोलिसिससाठी १८५२ मे. टन प्लास्टिक कचरा वापरला गेला.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई महानगरपालिकेला जुलै, २०२२ व जानेवारी,२०२३ मध्ये समुद्रामध्ये प्लास्टिक कचरा वाहून जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी ४ समुद्रकिनारा स्वच्छता यंत्रे दिलेली आहेत. सदरील यंत्रे दादर, माहीम आणि जुहू येथील समुद्रकिनारी वापरली जात आहेत.

एकल वापर प्लास्टिकच्या प्रभावी अंमलबजावणी करिता मुंबई महानगरपालीकेच्या २४ वॉर्डमध्ये २४ दक्षता पथके तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामध्ये पोलीस विभाग, महानगरपालिकेच्या प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात येणार आहे. या दक्षता पथकांमार्फत आस्थापना, दुकाने, हॉटेल्स (cafeteria), मॉल्स इत्यादीचे तपासणी अभियान राबविण्यात येणार आहे.

**********************

लक्षवेधी सूचना क्र.३३३

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

श्री. सुनिल प्रभू व श्रीमती मनिषा चौधरी, श्री. विनोद निकोले, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. राजेश रघुनाथ पाटील, श्री. क्षितीज ठाकूर, श्री. हितेंद्र ठाकूर, श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, श्री. कैलास गोरंट्याल वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३३३ पुढीलप्रमाणे आहे:-

"केंद्र व राज्य सरकारतर्फे मंजूर करण्यात आलेल्या बुलेट ट्रेन मार्गाच्या विकास कामात पालघर तालुक्यातील शिगांव पाटीलपाडा येथील सर्व्हे क्र. ४६४ च्या जमिनीमध्ये शासकीय अधिकारी, बुलेट ट्रेनमधील अधिकारी आणि भूमाफीया यांनी आर्थिक संगनमत करुन बुलेट ट्रेन मार्गातील जमिनीवर नव्याने घर बांधण्याची शक्कल लढवून व त्याद्वारे आर्थिक मोबदला रक्कम मिळवून कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केल्याचे प्रकरण दि. २० जून, २०२३ रोजी निदर्शनास येणे, सदरहू जमिनीवर आदिवासी, भूमिहीन आणि शेतमजूर कुटुबांना शासनाकडून वाटप करण्यात आलेल्या जागेवर परप्रांतीयांनी बांधलेली घरे ही बुलेट ट्रेन प्रकल्पाचा मार्ग निश्चिती झाल्यानंतर दोन-तीन वर्षापूर्वी सिमेंट पत्र्यांचा वापर करून कच्चा स्वरुपाची उभारण्यात आलेली असून येथील ७० घरापैकी १६ घरांना प्रत्येकी १३ लाख रुपये या प्रमाणे मोबदला रक्कम शासनातर्फे अदा करण्यात येणे, सदरहू प्रकरणी संबंधित भूमाफिया, शासकीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांनी आर्थिक संगनमत करून आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार केल्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात झालेला शासकीय निधीचा अपव्यय व आर्थिक नुकसान, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन दोषींविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

केंद्र व राज्य शासनामार्फत मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी पालघर तालुक्यातील मौजे-शिगांव, पाटीलपाडा, येथील स.नं./गट नं. ४६४/१६६ (नविन) मधील संपादीत क्षेत्र ०.२१.२३ हे. आर. क्षेत्रावरील एकुण १६ घरे संपादित करण्यात आली आहेत. सदरच्या १६ घरांपैकी १५ घरांना रु.१,९२,९९,५००/- एवढा मोबदला अदा केला आहे. उर्वरीत १ घराचे कागदपत्र न मिळाल्याने मोबदला अदा केलेला नाही.

दिनांक २४.०६.२०२३ रोजी दैनिक लोकसत्ता वृत्तपत्रामध्ये "बुलेट ट्रेन मार्गातील अनधिकृत झोपड्यांवर कारवाई होणार" या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने संबधित मंडळ अधिकारी व तलाठी यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देऊन उपविभागीय अधिकारी, पालघर यांना अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार प्रश्नाधीन जमीन सन २०२० पर्यंत मोकळी होती. जमीन मालक भातशेती करीत होते. परंतु, सदर ठिकाणी परप्रांतीय इसमांनी बेकायदेशीरपणे १५ ते १६ झोपड्यांचे बांधकाम केले. तद्नंतर बुलेट ट्रेनच्या मार्गीकेत एकूण ५५ व इतर मोकळ्या जागेत ६० अशा एकुण १०५ झोपड्यांचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले. काही झोपड्यात रहीवाशी आढळून आले तर काही झोपड्या मोकळ्या असल्याचे निदर्शनास आले.

संयुक्त मोजणी अहवालानुसार १६ चाळधारकांची नावांची नोंद असल्याने मोबदला देय होतो. उर्वरीत अनधिकृत चाळधारकांना मोबदला अदा करण्यात आलेला नाही.

---